
Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-II
April - June - 2019
Marathi / Hindi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta
Prakashan

PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts Commerce & Science College
Mandangad.Dist.Ratnagiri 415203

VOLUME - VIII, ISSUE - II - APRIL - JUNE - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | जागतिक भूक निर्देशांक आणि भारत<br>**डॉ. महेश प्रभाकरराव देशमुख** | १-७ |
| २ | आजची परीक्षा पध्दती<br>**अनिल जनार्दन पांडे** | ८-११ |
| ३ | प्रधानमंत्री उज्ज्वला योजना अंतर्गत गॅस सिलेंडर लाभधारक महिलांचा जीवनमानात झालेले परीवर्तन<br>**डॉ. माधुरी झाडे** | १२-२० |
| ४ | धनगर समाजाची बदलती आर्थिक परिस्थिती व उपजिविका<br>**नामदेव श्रीपती हेडे** | २१-२६ |
| ५ | बाल हक्क संरक्षणात चाईल्डलाईन १०९८ चे विस्तारीत जाळे<br>**प्रा. श्री. प्रशांत र. घुलक्षे** | २७-३३ |
| ६ | मराठी बालमासिके : परंपरा आणि सद्यस्थिती<br>**डॉ. राजाराम झोडगे** | ३४-३७ |
| ७ | कृषी विकास : शेतकऱ्यापुढील आव्हाने<br>**डॉ. राखी सिद्राम सलगर** | ३८-४० |
| ८ | भारत आणि जागतिकीकरण<br>**प्रा. शहाणे रंजना प्रल्हादराव** | ४१-४६ |
| ९ | मराठवाड्यातील शेतकऱ्यांची आत्महत्या एक अभ्यास<br>**डॉ. सोमनाथ संभाजी लांडगे** | ४७-५३ |
| १० | महिला अत्याचार व शासनाची भूमिका<br>**डॉ. सुनिता डी. भोईकर** | ५४-६० |
| ११ | दलित कथेतील जातीयतेचे चित्रण एक अवलोकन<br>**प्रा. कांबळे डी. आर.** | ६१-६४ |
| १२ | नाटकातील वेशभूषा : अभिनेता समन्वय<br>**प्रा. डॉ. गहिनीनाथ वळेकर** | ६५-६७ |
| १३ | ग्रथालय संगणकीकरण : गरज आणि महत्त्व<br>**धोंगडे रवि देवराव** | ६८-७१ |





PRINCIPAL
Loknete Gop... Munde
A... Commerce & ... College
Mandangad, Dist. Ratnagiri.415203

VOLUME - VIII, ISSUE - II - APRIL - JUNE - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | महाराष्ट्राच्या गोंदिया जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येचे जैवशास्त्रीय वैशिष्ट्ये<br>**निलकंठ आर. भेंडारकर**<br>**डॉ. रजनी ए. चतुर्वेदी** | ७२-८० |
| १५ | ग. ज. लॉर्ड विल्यम बेंटिकच्या सुधारणा आणि ग. ज. लॉर्ड डलहौसीचे विलीनीकरण धोरण<br>**डॉ. सचिन उत्तमराव हंचाटे** | ८१-८४ |
| १६ | महिला आरक्षणाबाबतची उदासिनता : एक अभ्यास<br>**डॉ. शाम कदम** | ८५-८६ |
| १७ | नांदेड जिल्ह्यातील आदिवासींच्या शैक्षणिक विकासात आश्रमशाळांची भूमिका<br>**डॉ. टि. व्ही. मुंडे**<br>**शेषराव सयाजी पालेपवाड** | ८७-९३ |
| १८ | अपंग विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास व सामाजिक, आर्थिक समस्या एक अभ्यास<br>**भोसले उमेश सुदामराव** | ९४-९९ |
| १९ | सार्वत्रिक मूळ उत्पन्न : गरीबी व सामाजिक न्यायाच्या दृष्टिने एक महत्त्वपूर्ण योजना<br>**डॉ. वाल्मिक दगडू परहर** | १००-१०४ |
| २० | भारतातील जगप्रसिद्ध बौद्ध विद्यापीठ<br>**प्रा. राजेश उत्तमराव शेगांवकर** | १०५-१०७ |
| २१ | कठपुतली कलेचा उगम, विकास आणि सद्यस्थिती<br>**डॉ. मीनल श्रीगिरीवार** | १०८-११२ |
| २२ | शासकीय आरोग्य धोरणानुसार बिदर जिल्ह्यातील आवश्यक प्राथमिक आरोग्य केंद्र<br>**पाटील भाग्यश्री शंकरराव** | ११३-११४ |




PRINCIPAL

VOLUME – VIII, ISSUE - II - APRIL - JUNE - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १९. सार्वत्रिक मूळ उत्पन्न : गरीबी व सामाजिक न्यायाच्या दृष्टिने एक महत्त्वपूर्ण योजना

डॉ. वाल्मिक दगडू परहर
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मंडणगड, ता. मंडणगड, जि. रत्नागिरी.

भारतासारख्या विकसनशिल राष्ट्राच्या आर्थिक विकासातील बेरोजगारी, दारिद्रय, आर्थिक विषमता, महागाई आणि सामाजिक विषमता हे मूळ अडसर आहेत. बेकारी व दारिद्रय या केवळ आर्थिक समस्या नसून त्या एक प्रकारच्या सार्वत्रिक व सामाजिक स्वरूपाच्या समस्या आहेत. बेरोजगारी व दारिद्रयात जीवन जगणाऱ्या समाजाची क्रयशक्ती घटून समाजाची उपभोग प्रवृत्ती, राहणीमानाचा दर्जा निम्न पातळीपर्यंत खाली घसरून सामाजिक कल्याणात घट होते. म्हणून गरीबी दूर करणे आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टिने समाजामध्ये वस्तू व सेवा, उत्पन्न यांचे समान वितरण होणे आवश्यक आहे. त्यासाठी समाजातील उत्पन्न विषमतेतील तफावत कमी करणे, गरीबी व दारिद्रय निर्मूलन, मूलभूत गरजांची पूर्तता, राहणीमानाचा दर्जा उंचावणे व सामाजिक विषमतेच्या दृष्टिने सर्वासाठी उत्पन्न या योजनेचे योगदान महत्त्वाचे आहे. सार्वत्रिक मूळ उत्पन्नाच्या माध्यमातून समाजातील सर्व लोकांना आर्थिक संरक्षण मिळाले तर समाजाची खर्च करण्याची प्रवृत्ती वाढून विविध वस्तू व सेवांची खरेदीशक्ती वाढते. परिणामी सामाजिक कल्याणात वृध्दी घडून अर्थव्यवस्था बलशाली बनण्यास मदत होते.

प्रस्तूत शोधनिबंध हा दुय्यम साधन सामग्रीवर आधारित आहे. सार्वत्रिक मूळ उत्पन्न संकल्पनेसंबंधित विविध संदर्भ ग्रंथ, पाक्षिके, मासिके, नियतकालिके, भारताचा आर्थिक पाहणी अहवाल व संकेत स्थळे आदींमधून संकलित केली आहे. या दुय्यम माहितीच्या आधारे शोधनिबंध तयार केला असून शोध निबंधात सार्वत्रिक मूळ उत्पन्नाचा अर्थ, सकारत्मक व नकारत्मक प्रभाव आणि गरीबी व सामाजिक न्यायातील योगदानाचा आढावा घेण्यात आला आहे.

**सार्वत्रिक मूळ उत्पन्नाची संकल्पना**

सार्वत्रिक मूळ उत्पन्ना (Unversal Basic Income) ची संकल्पना वैश्विक मूळ उत्पन्न, मूळ उत्पन्न, मूळ उत्पन्न हमी, मूलभूत उत्पन्न पायलट, पूर्ण मूलभूत उत्पन्न व आंशिक उत्पन्न या नावाने ओळखली जाते.

'अनुकालित रोख्यांची देयके बिनशर्तपणे सर्वांना बिगर साधन चाचणीचे आणि बिगर कामाच्या आवश्यकतेचे वैयक्तिक आधारावर प्रदान केली जातात त्यास सार्वत्रिक मूळ उत्पन्नअसे म्हणतात.'देशाच्या प्रत्येक नागरिकाला नियमित पैसे मिळवून देण्याची हमी देणारी योजना म्हणजे सार्वत्रिक मूळ उत्पन्न होय.

सार्वत्रिक मूळ उत्पन्नात ठराविक कालावधीत रोख स्वरूपात रक्कम वैयक्तिक आधारावर कोणत्याही विना परतावा देय असणारी रक्कम, कोणत्याही अर्थ चाचणी किंवा कामाशिवाय देय आहे. मूलभूत उत्पन्नाच्या



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde

नियमित कालावधीत रोख देयक म्हणजे वैयक्तिक आधारावर विना चाचणी किंवा कामकाजाच्या आवश्यकता नसलेल्या सर्वसाधारण वितरण करणे. मूलभूत उत्पन्न मूळ जीवंत खर्च पूर्ण करण्यासाठी पुरेशी देय रक्कम आहे. सार्वत्रिक मूळ उत्पन्नाचे नियमितता किंवा कालावधी, रोख रक्कम, वैयक्तिक, सार्वत्रिकता आणि बिनशर्ते हे पाच महत्त्वाचे घटक आहेत.

**नियतकालिक (कालावधी)**

सार्वत्रिक उत्पन्न हे नियमित कालावधीत दिले जाते. ते एक बंद अनुदान नसून सातत्यपूर्ण स्वरूपाचे अनुदान आहे.

**रोख रक्कम**

सार्वत्रिक उत्पन्न हे रोख पैसाच्या स्वरूपात दिले जाते. हे उत्पन्न ज्यांना प्राप्त होते ते कोणत्याही कार्यासाठी वापर करू शकतात. एखादया समुदायात सर्व व्यक्तिंना रोख रक्कम देण्याची हमी असते.

**वैयक्तिक आधार**

सार्वत्रिक मूळ उत्पन्न हे वैयक्तिक आधारावर दिले जाते. ते प्रत्येक कुटुंबाला नव्हे तर प्रत्येक व्यक्तिला दिले जाते. ते वैयक्तिक आधारावर प्रदान केले जाते.

**सार्वत्रिकता**

सार्वत्रिक मूळ उत्पन्न योजना सर्वांसाठी असून ते विना चाचणी किंवा कामाशिवाय सर्वांना दिले जाते.

बिनशर्त

या योजनेतर्गत लोकांना पैसे घेण्यास कोणतीही पात्रता किंवा अट नाही. कोणत्याही अर्थ चाचणी किंवा कामाशिवाय कमीत कमी उत्पन्नाची हमी दिली जाते.

सार्वत्रिक मूळ उत्पन्नाचा लाभ घेणाऱ्या कोणालाही कसलेही काम करावे लागत नाही. व्यक्तिच्या वयाचा, लिंगाचा, व्यवसायाचा आणि सामाजिक, शैक्षणिक पातळीचा विचार न करता नियमितपणे एक विशिष्ट रक्कम देऊ केली जाते. त्यामुळे सार्वत्रिक उत्पन्न हे सार्वत्रिक पातळीवर नियमितपणे दरडोई एका विशिष्ट रक्कमेचे विना अट होणारे रोख वितरण आहे.

सन २०१७ हे वर्ष जागतिक सार्वत्रिक मूळ उत्पन्नाचे एक पायलेट वर्ष आहे. कारण या वर्षी जगातील अनेक देशातील सरकारने सार्वत्रिक मूळ उत्पन्न योजनेच्या प्रायोगिक तत्वावर चाचण्या सुरू केलेल्या आहेत. सन १९७० पासून विकसित उदा. अमेरिका, युरोप देशांमध्ये सार्वत्रिक मूळ उत्पन्नासंबंधित प्रयोग करण्यात आले. १९ व्या शतकात आणि १९६० च्या दशकापर्यंत मूलभूत उत्पन्नावरील चर्चा (वाद) मर्यादीत होते. मात्र सन १९६० आणि १९७० मध्ये युनाटेड स्टेट्स अणि कॅनडातील अनेक शहरांमध्ये नकारत्मक उत्पन्न करांसंबंधित (Negative Income Taxation) कल्याणकारी प्रयोगांसह अनेक प्रयोग केले गेले आहेत. २००९ पासून केनिया व युगांडा येथील गरीब नागरीकांना बिनशर्त रोख हस्तांतरण प्रदान करण्यात आले. केनिया, नेदरलॅंड, स्कॉटलंड, फिनलंड आणि अमेरिका या देशांमध्ये मूळ उत्पन्नाचे प्रयोग सुरू केले आहेत.



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts Commerce & Science
Mandangad, Dist.Ratnagiri.415203

**भारतातील मूळ उत्पन्नची संकल्पना**

भारत सरकारने २०१६–१७ च्या आर्थिक पाहणी अहवालात सार्वत्रिक मूळ उत्पन्नाचा कार्यक्रम समाविष्ट करण्यात आला. या योजनेतून देशातील नागरीकांना किमान उत्पन्न मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सरकार सार्वत्रिक मूळ उत्पन्नातून देशातील सर्व नागरीकांना किमान उत्पन्न पातळीच्या हमीचे समर्थन करते. भारतात सार्वत्रिक मूळ उत्पन्नांत सार्वभौमत्व, बिनशर्तपणे आणि एजन्सी (संस्था) या घटकांचा समावेश केला आहे. आपल्या देशातील सार्वत्रिक मूळ उत्पन्नाची योजना देशातील प्रत्येक नागरीकाला 'त्यांच्या किमान गरजा भागविण्यासाठी मूलभूत उत्पन्न' देण्याच्या हेतूने तयार करण्यात आली आहे. सार्वत्रिक मूळ उत्पन्न हे मिळकत, संसाधने किंवा रोजगाराची स्थिती विचारात न घेता सर्व नागरिकांना एक निश्चित रक्कम देऊ करणारे उत्पन्न हमीचे प्रतिमान आहे. मूळ उत्पन्नाचा मुख्य उद्येश हा गरीबी कमी करणे आणि नागरिकांमध्ये समानता वाढविणे आहे. भारतात सन २०१० मध्ये मध्यप्रदेशातील दोन गावात लहान प्रमाणात महिला स्वय संघटनानी सार्वत्रिक मूळ उत्पन्न पायलेट कार्यक्रमाचा प्रस्ताव सादर केला.

सन २०१६–१७ या वर्षाच्या आर्थिक पाहणी अहवालात सार्वत्रिक मूलभूत उत्पन्न ही संकल्पना मांडण्यात आली आहे. याच वर्षाचा अर्थसंकल्प मांडत असताना या संकल्पनेचा ओझरता उल्लेख करण्यात आला. सार्वत्रिक मूळ उत्पन्न हा शब्द प्रयोग नवीन असला तरी ही संकल्पना देशातील गरीबी, बेकारी व सामाजिक न्यायाशी निगडीत आहे. क्रेंद व राज्य सरकारांनी गरीबी व बेकारी हटवण्यासाठी हजारो कल्याणकारी कार्यक्रम हाती घेतले असून त्यावर हजारो कोटी रूपये खर्च झाले आणि सद्याही होत आहेत परंतु त्यापासून अपेक्षित फलनिष्पती मिळालेली दिसून येत नाही. सरकारने दारिद्रय व बेरोजगारी दूर करण्याचा एक उपाय म्हणून विविध मार्गांनी अनुदाने दिली आहेत. केंद्र व राज्य सरकारांनी अन्नधान्य, खते, इंधन, वायू, रॉकेल, पेट्रोल, डिझेल, आयाती, रेल्वे सेवा अशा बहुसंख्य वस्तू व सेवांवर अनुदाने देत आहे परंतु या प्रकारच्या अनुदानाची समस्या सोडविण्यासाठीची फलनिष्पती फारच मर्यादित असून केवळ खर्चात प्रचंड प्रमाणात वाढ होत आहे.

भारतात १८ व्या शतकातील दारिद्रय कमी करण्याचा मार्ग म्हणून ही योजना असून या योजनेमुळे सामाजिक बहिष्कार वाढण्याची जोखीम, आर्थिक उलथापालथ आणि वाढती असमनता कमी होण्यास मदत होईल. भारत सरकार सार्वत्रिक मूळ उत्पन्न योजनेकडे गरीबी दूर करण्याचे साधन आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा उपाय म्हणून पाहत आहे. या योजनेत सामाजिक न्याय आणि उत्पादक अर्थव्यवस्था या दोन्हींही बाबींचा विचार करता एक मूलभूत आणि आकर्षक नमुन्यातील बदल मानला जात आहे. तसेच अस्तित्वात असलेल्या भ्रष्ट आणि अप्रभावी सामाजिक कार्यक्रमांचा पर्याय म्हणून सार्वत्रिक मूळ उत्पन्नाची अंमलबजावणी केली आहे.

दारिद्रय कमी करण्याचा मार्ग आणि विषमता कमी करण्याचा एक व्यावहारीक उपाय म्हणूनसार्वत्रिक मूळ उत्पन्नाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.या योजनेची दारिद्रय रेषेखालील सर्व लोकांना सामाजिक संरक्षण, नागरिकांना आर्थिक संरक्षण देणे, लोकांची खर्च करण्याची क्षमता वाढविणे ही उदिष्टये आहेत. देशातील



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts Commerce & Science C

प्रत्येक नागरिकाला नियमित पैसे मिळवून देण्याची हमी देणारी योजना असून प्रत्येक नागरिकाला बिनशर्त, वैयक्तिक पातळीवर सार्वत्रिक स्वरूपाची रोख रक्कमेची हमी मिळते.

स्वातंत्र्यापासून भारताने गरीबीचे प्रमाण सुमारे ७०टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत आणण्याचे उल्लेखनिय उदिष्टये निश्चित केले आहे. दारिद्रयरेषेखालील लोकांच्या मूलभूत गरजा भागविण्याचा मुख्य प्रश्न असतो. त्यासाठी या लोकांना दररोजच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी कायम उत्पन्न मिळणे आवश्यक असते. ही हमी सार्वत्रिक उत्पन्नातून मिळू शकते. सन २०११–१२ मध्ये भारतात दारिद्रय रेषेखालील २७० लोक होते. त्यापैकी २१६.५ दशलक्ष ग्रामीण तर ५२.८ दशलक्ष लोक शहरी भागातील आहेत. भारतात ही योजना दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी असून सरकार दर वर्षी रूपये ३.२४ लाख कोटी खर्च करेल. प्रत्येक गरीब व्यक्तिला दरमहा १००० रूपये उत्पन्न दिले जाईल तसेच सरकार गरीबांना दिल्या जाणाऱ्या अनुदानावर खर्च–लाभ विश्लेषण सादर करणार आहे. गरीबांना थेट रोख पैसा हस्तांतरण करण्याऐवजी सार्वत्रिक मूळ उत्पन्नाच्या स्वरूपात पैसे देण्याची हमी देण्यात येईल की ज्यामधून दारिद्रय रेषेखालील लोकांच्या किमान मूलभूत गरजा पूर्ण करण्याची क्षमता असून इतके उत्पन्न मिळाल्याने खरेदी शक्तीत वाढ होते परिणामी वस्तू व सेवाचा उपभोग व राहणीमानाचा दर्जा वाढून कल्याणाची पातळी उंचावते. तसेच सार्वत्रिक मूळ उत्पन्नाच्या माध्यमातून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो. या संकल्पनेतून सर्व तळागाळातील नागरिकांना कायम स्वरूपी किमान उत्पन्न मिळवून देण्याची हमी दिली जाते त्यामूळे समाजात उत्पन्नाचे समान वितरण होण्यास मदत होते.

**सार्वत्रिक मूळ उत्पन्नाचा परिणाम/प्रभाव**

भारतात सार्वत्रिक मूलभूत उत्पन्न योजनेचे सकारात्मक आणि नकारत्मक परिणाम खालील प्रमाणे सांगता येतात.

**सार्वत्रिक मूळ उत्पन्नाचे सकारत्मक परिणाम**

१. दारिद्रय निर्मूलनास मदत
२. सामाजिक न्याय
३. शेतकऱ्यांचे दु:ख कमी करण्यास मदत
४. कौशल्य विकास
५. महिला सशक्तीकरण/सक्षमीकरण
६. सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकता विकासास चालना

**सार्वत्रिक मूळ उत्पन्नाचे नकारत्मक परिणाम**

१. व्यवहार्यता नाही
२. उत्पन्न असमानता
३. करपात्र उत्पन्न कमी
४. श्रम खर्चात वाढ



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts,Commerce & Science College
Mandangad.Dist.Ratnagiri 415203

५. अपर्याप्त रोख हस्तांरण

भारतात असे प्रकारे सार्वत्रिक मूळ उत्पन्नाचे विविध सकारत्मक व नकारत्मक प्रभाव पडू शकतात. परंतु भारतासारख्या उदयोन्मुख होणाऱ्या राष्ट्राच्या आर्थिक विकासातील बेरोजगारी, दारिद्रय, आर्थिक विषमता, महागाई व सामाजिक विषमता या मुख्य समस्या आहेत. या समस्यांवर मात करण्यासाठी सार्वत्रिक मूळ उत्पन्न संकल्पनेचे महत्वपूर्ण योगदान असू शकते. कारण सार्वत्रिक मूळ उत्पन्न हे सार्वत्रिक पातळीवर नियमित व वैयक्तिक आधारावर विना अट होणारे रोख वितरण आहे. गरीबी हटवणे आणि सामाजिक न्यायासाठी हा एक नवा प्रयोग करून पाहणे आवश्यक आहे. सार्वत्रिक मूळ उत्पन्नामुळे गरीबी, वंचितता, सामाजिक दुर्बलता व शोषण दूर होण्यास मदत होऊ शकते. हा बेरोजगारीच्या विरूध्दातील एक प्रकारचा विमा असून संपत्तीच्या न्याय वितरणाचे साधन आहे.

भारतातील सार्वत्रिक मूळ उत्पन्नाची संकल्पना देशातील प्रत्येक नागरीकाला त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मूलभूत उत्पन्न पुरविण्याच्या हेतूने तयार करण्यात आले आहे. हे एक कायम उत्पन्न मिळवून देणारे प्रतिमान आहे. सार्वत्रिक मूळ उत्पन्नाचा मूळ उद्येश गरीबी कमी करणे आणि नागरीकांमध्ये समानता वाढविणे असून या योजनेच्या सकारत्मक प्रभावापेक्षा नकारत्मक प्रभाव अधिक प्रमाणात होऊ शकतो. लोकांना कायम उत्पन्नाच्या हमीमुळे लोकांमध्ये आळशीपणा, कामचोर वृत्ती वाढीस प्रेरणा मिळू शकते तसेच लोकांचा शिक्षण, आरोग्यावरील खर्चापेक्षा चैनी, प्रलोभन वस्तूंवरील खर्चात वाढ होऊ शकते.

**संदर्भ**

१. डॉ. दिपक डी शेलार, धनंजय टी पगारे, आनंद अण्णासो कांबळे, 'भारतीय अर्थव्यवस्था: समकालीन समस्या (अर्थशास्त्र ३)' टच—मॉक्स प्रकाशन, २०१७—१८ पुणे, पान. नं. ३.१ ते ३. ३१.

२. Government of India, 'Economic Survey of India' 2016-17, Oxford University Press, New Delhi, Page No. 170 to 212.

३. Ray, Debras (2016), 'The Universal Basic Share', livemint.com

४. https://en.wikipedia.org/wiki/Basic_income

५. https://www.unersalincom.org



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts Commerce & Science College